नवभारत

# 290 विद्यार्थियों ने दी संविधान गौरव परीक्षा



■गोंदिया, ब्यूरो. भारतीय संविधान के गौरवशाली 75 वर्ष पूरे होने के अवसर पर भारतीय संविधान के अमृत महोत्सव 'हर घर संविधान' जागृति अभियान द्वारा रविवार को जिला स्तर पर संविधान सम्मान प्रतियोगिता का आयोजन किया गया. जिसके अनुसार सरकारी पॉलिटेक्निक कॉलेज के 290 छात्रों ने उक्त परीक्षा में पंजीकरण कराया और परीक्षा में शामिल हुए. परीक्षा समाप्त होने के बाद छात्रों ने कहा कि परीक्षा के कारण उन्हें संविधान के आवश्यक अनुच्छेद, संविधान की प्रस्तावना का अर्थ, मौलिक अधिकार और मौलिक कर्तव्य जैसी बहुत सारी जानकारी मिली तथा विद्यार्थियों ने इस तरह के परीक्षा आयोजन होने पर प्राचार्य का आभार माना. सफलतार्थ पॉलिटेक्निक कॉलेज के प्राचार्य डा.सी.डी. गोलघाटे, विभाग प्रमुख डा. पी.एस. शर्मा, प्रा. एल.एन. राऊत, प्रा.आर.पी. बडोले, प्रा. एस.आर. सारंगपुरे, प्रा. बी.एम. मेश्राम, प्रा. देवतारे और सभी अधिकारी, कर्मचारियों ने प्रयास किया.

Gondia Plus Edition
Oct 10, 2024 Page No. 2
Powered by: navbharatlive.com

मुंबई,सोमवार 05 ऑगस्ट 2024

# बजाज चंद्रपूर तंत्रनिकेतन मध्ये अतिथी व्याख्यान, भव्य रांगोळी व पोस्टर स्पर्धेचे आयोजन संपन्न






■ मीडिया वार्ता वृत्तसेवा

**चंद्रपूर :** सर्वोदय महिला मंडळ द्वारा संचालित बजाज चंद्रपूर तंत्रनिकेतन मध्ये २ आणि ३ ऑगस्ट रोजी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी स्वयम, एनपीटीईएल आणि मोक्स या विषयावर ऑन लाईन अतिथी व्याख्यान तसेच भव्य रांगोळी व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. शुक्रवार, २ ऑगस्टला सकाळी १२ वाजता संगणक विभागाच्या वतीने ऑन लाईन अतिथी व्याख्यान तसेच भव्य रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख वक्ते भाग्यश्री मेश्राम, प्राध्यापक संगणक विभाग गव्हर्नमेंट पॉ लिटेक्निक गोंदिया, त्यांनी विविध प्रतिमा आणि आलेखाच्या माध्यमातून त्यांचे व्याख्यान स्पष्ट केले. योग्य दोन्ही प्रकारे संवाद साधून त्यांनी अतिशय आकर्षक पद्धतीने आपले व्याख्यान सदर केले आणि प्रत्येकाने या संकल्पनांचा आनंद घेतला. सत्रादरम्यान विद्यार्थ्यांचा वक्त्यांशी अतिशय मनमोकळे पणाने संवाद झाला. तसेच दुसऱ्या दिवशी शनिवार, ३ ऑगस्ट रोजी क्रीडा विभागाच्या हॉल मध्ये भव्य रांगोळी व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे कार्यपालन अधिकारी भरत बजाज, नवनियुक्त प्राचार्य विजय कोयाळ, उप प्राचार्य डी. के. चौधरी यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी तथा विद्यार्थीनिनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन आपल्या कला गुणांना प्रोत्साहन देत सुंदर अश्या कलाकृती रेखाटल्या. संगणक विभागाचे तसेच इतर सर्व विभागाचे प्राध्यापकही या वेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स
गुरुवार, २२ फेब्रुवारी २०२४

## प्रश्नमंजूषा स्पर्धा

नाशिकरोड : येथील सर डॉ. मो. स. गोसावी तंत्रनिकेतनमध्ये राज्य तंत्रशिक्षण मंडळ प्रायोजित राज्यस्तरीय तांत्रिक प्रश्नमंजूषा स्पर्धा झाली. खामगाव शासकीय तंत्रनिकेतनचे गौरव सोनार व धनेश शिंगाडे यांनी १५ हजारांचे प्रथम, गुरू गोबिंद सिंग तंत्रनिकेतनचे अथर्व सोनावणे व अथर्व खंडागळे यांनी दहा हजारांचे द्वितीय, गोंदिया शासकीय तंत्रनिकेतनचे कुणाल बाघेले व यश गुप्ता यांनी पाच हजारांचे तृतीय पारितोषिक मिळविले. प्रकल्प संचालक प्रा. प्रदीप देशपांडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# अणुविद्युत व दूरसंचार विभाग द्वारा मनाया गया अभियंता एवं शिक्षक दिवस



**गोंदिया(कशिश)।** गोंदिया के एकमात्र शासकीय तंत्रनिकेतन के अणुविद्युत एवं दूरसंचार विभाग द्वारा 13 सितंबर को अभियंता दिवस एवं शिक्षक दिवस विभागाध्यक्ष डॉ. प्रशांत शर्मा की अध्यक्षता में एकसाथ मनाया गया। कार्यक्रम के प्रारंभ में भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन एवं भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया की प्रतिमा पर पुष्पमाला अर्पित कर स्वागत गीत के साथ उपस्थित सभी अधिकारियों एवं कर्मचारियों का स्वागत किया गया। कार्यक्रम के अवसर पर तृतीय एवं द्वितीय वर्ष के विद्यार्थियों ने भाषण एवं कविता के माध्यम से दोनों महापुरुषों के जीवन पर प्रकाश डाला। प्रो. लेखानंद राऊत ने अपने भाषण में छात्रों को मार्गदर्शन देते हुए कहा कि यदि वे जीवन में सफलता प्राप्त करना चाहते हैं, तो उन्हें हमेशा सकारात्मक दृष्टिकोण रखना चाहिए साथ ही प्रो. भूपेंद्र देशमुख एवं प्रो.देवतारे ने सलाह 'दी कि विद्यार्थियों को हमेशा महापुरुषों के आदर्शों पर चलकर उन्हें गुरु बनाना चाहिए. प्रो. श्रीमती पेटकर, प्रो. श्रीमती गेडाम, प्रो. श्रीमती पडवेकर, प्रो. रामटेके, प्रो. सारंगपुरे, प्रो. राऊत, प्रो. जीवतोड़े ने भी भाषणों के माध्यम से विद्यार्थियों का मार्गदर्शन किया। डॉ. प्रशांत शर्मा ने अपने अध्यक्षीय भाषण से बच्चों को मंत्रमुग्ध कर कहा कि छात्रों को हमेशा शांत रहना चाहिए और अच्छी तरह से अध्ययन करना चाहिए । कार्यक्रम का संचालन कु. यामिनी ठाकरे एवं दर्शन भर्रे ने किया। धन्यवाद ज्ञापन कु. पूर्वा रोकड़े ने किया। कार्यक्रम को सफल बनाने में तृतीय एवं द्वितीय वर्ष के समस्त विद्यार्थियों ने सहयोग दिया।

देशोन्नती

# अभियंता दिवस व शिक्षक दिवस साजरा



देशोन्नती वृत्तसंकलन

**गोंदिया :** येथील एकमेव असलेल्या शासकीय तंत्रनिकेतनातील अणुविद्युत व दूरसंचार विभागातर्फे ता. १३ सप्टेंबर रोजी अभियंता दिनाचे तसेच शिक्षक दिनाचे संयुक्तिक कार्यक्रम तेथील विद्यार्थ्यांनी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रशांत शर्मा यांच्या अध्यक्षते खाली साजरा केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन तसेच भारतरत् सर मोक्षगुण्डम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत गीताने स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या क्षणी तृतीय व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांनी भाषणाद्वारे व कवितेच्या माध्यमातून दोघेही महापुरुपांच्या जीवनावर प्रकाश टाकला. आयुष्यात यश संपादन करायचे असेल तर विद्यार्थ्यांनी नेहमी सकारात्मक दृष्टीकोन बाळगावा असे प्रा. लेखानंद राउत यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी नेहमी बोर महापुरुषांचे आदर्श बाळगून त्यांना गुरु बनवावे असे प्रतिपादन प्रा. भूपेंद्र देशमुख व प्रा. देवतारे यांनी मार्गदर्शन केले.

प्रा. पेटकर, प्रा. श्रीमती गेडाम, प्रा. श्रीमती पडवेकर, प्रा. रामटेके, प्रा, सारंगपुरे, प्रा. राउत, प्रा. जीवतोडे यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना भाषणाद्वारे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी नेहमी शांत राहून चांगल्या गोष्ठी शिकाव्यात असे प्रतिपादन डॉ. प्रशांत शर्मा यांनी आपल्या अध्यक्षीय वाणीतून मुलांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कु. यामिनी ठाकरे व दर्शन भरे यांनी केले, आभारप्रदर्शन कु. पूर्वा रोकडे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी तृतीय तसेच द्वितीय वर्षातील संपूर्णँ ग्ह् विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

Gondia Edition Edition
Sep 16, 2024 Page No. 6
Powered by: erelego.com

लोकमत

# तंत्रनिकेतन प्रवेशाला मिळाली मुदतवाढ

## ९ जुलैपर्यंत करता येणार आता विद्यार्थ्यांना अर्ज

लोकमत न्यूज नेटवर

**गोंदिया :** तंत्रनिकेतन (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेत ऑनलाइन अर्ज सादर करण्यास मंगळवारी मुदतवाढ देण्यात आली. सुधारित वेळापत्रकानुसार ९ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरता येणार आहेत. २९ मेपासून सुरू झालेल्या नोंदणी प्रक्रियेत आजपर्यंत १३७७ विद्यार्थ्यांनी नोंदणी तर ९१६ विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा करून प्रवेश निश्चित केले आहे.

दहावी निकालानंतर तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे पॉलिटेक्निक अभ्यासक्रमांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यावर्षी २९ मेपासून ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येत आहे. प्रवेश प्रक्रियेच्यावेळापत्रकानुसार ऑनलाइन अर्ज भरणे, कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चिती प्रक्रियेसाठी २५ जूनपर्यंत मुदत देण्यात आली होती. मुदत संपत असताना मंगळवारी मुदतवाढीसह सुधारित वेळापत्रक संचालक कार्यालयाने जाहीर करण्यात आले. ९ जुलैपर्यंत विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्ज भरता येणार आहे. कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चितीची प्रक्रिया याच दरम्यान पूर्ण करता येणार आहे. यंदा ई-स्क्रूटनी, प्रत्यक्ष स्क्रूटनीची सुविधा उपलब्ध आहे. कॅपच्या विविध फेरींकरिता विकल्प अर्ज भरणे, कॅप जागावाटप, जागा स्वीकृती करणे, उमेदवाराचे वाटप केलेल्या संस्थेमध्ये उपस्थित राहणे, प्रवेशाची अंतिम तारीख इत्यादींबाबतचे पुढील वेळापत्रक अंतिम गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर घोषित केले जाणार असल्याचे शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ.सी.डी. गोळघाटे यांनी कळविले आहे.

### आतापर्यंत १३७७ अर्ज

या अभ्यासक्रमासाठी सुमारे महिनाभरापासून नोंदणीची प्रक्रिया सुरू आहे. २५ जून रोजी सायंकाळपर्यंत १३७७ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज केले आहेत. त्यापैकी ९१६ विद्यार्थ्यांनी शुल्क भरणा केली आहे. प्रवेशाच्या तीन फेरी घेण्यात येणार आहेत. १८३० हजार प्रवेश क्षमता आहे. प्रवेशासाठी अर्ज सुविधा केंद्र आहेत. विद्यार्थ्यांना महत्वाच्या सूचनांसाठी विद्यार्थ्यांनी https://dte.maharashtra.gov.in या वेबसाईटला भेट द्यावी, असे संचालनालयाने स्पष्ट केले आहे.

### असे आहे सुधारित वेळापत्रक

- **ऑनलाइन अर्ज भरणे :** २९ मे ते ९ जुलै
- **कागदपत्र पडताळणी, अर्ज निश्चिती :** २९ मे ते ९ जुलै
- **तात्पुरती गुणवत्ता यादी :** ११ जुलै
- **गुणवत्ता यादीवरील आक्षेप :** १२ जुलै ते १४ जुलै
- **अंतिम गुणवत्ता यादी :** १६ जुलै



लोकमत

# पॉलिटेक्निकच्या ७० टक्के जागा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव

## एकूण ९६० जागा : प्रवेशप्रक्रिया सुरू : २५ जूनपर्यंत करता येणार अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

**गोंदिया :** राज्य तंत्रशिक्षण विभागातर्फे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता होणाऱ्या तंत्रनिकेतन अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रिया सुरू झाली आहे. जिल्ह्यातील शासकीय व खासगी तंत्रनिकेतनमध्ये ९६० जागा भरावयाच्या असून विद्यार्थ्यांनी २५ जून २०२४ पर्यंत ऑनलाइन अर्ज करून आपला प्रवेश निश्चित करावा, असे शासकीय तंत्रनिकेतन, गोंदियाचे प्राचार्य सी. डी. गोळघाटे यांनी कळविले आहे. विशेष म्हणजे ७० जागा जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

गोंदिया जिल्ह्यात चार पॉलिटेक्निक डिप्लोमा संस्था आहेत. शासकीय पॉलिटेक्निक गोंदिया ३६० जागा, श्री लक्ष्मणराव मानकर कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक आमगाव-१८० जागा, सी.एस.इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी देवरी-१८० जागा व गुरुकुल पॉलिटेक्निक नागरा-२४० जागा अशी येथील प्रवेश क्षमता आहे. शासकीय पॉलिटेक्निक या संस्थेची वार्षिक प्रवेश क्षमता ३६० आहे. या प्रमुख संस्थेचा परिसर १४.३५ एकर जमिनीवर पसरलेला आहे. कॅम्पसमध्ये १८० मुले, १४० मुलींचे स्वतंत्र वसतिगृहे आहेत. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा कल पॉलिटेक्निककडे वाढत असून ९६० जागा असल्याने विद्यार्थ्यांना मदत होणार आहे.

### प्रत्येक शाखेसाठी ६० जागा

संस्थेच्या सहा शाखेत प्रत्येकी ६० विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता आहे. यात यंत्र अभियांत्रिकी ६० जागा, संगणक अभियांत्रिकी-६० जागा, माहिती तंत्रज्ञान-६०



जागा, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी- ६० जागा, विद्युत अभियांत्रिकी- ६० जागा व स्थापत्य अभियांत्रिकी-६० जागांचा समावेश आहे. त्यापैकी यंत्र अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी अशा चार शाखांना राष्ट्रीय मान्यता मंडळ, ऑल इंडिया कौन्सिल ऑफ टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली यांच्यातर्फे शिक्षणाच्या उच्च दर्जा प्रमाणपत्र प्राप्त आहे.

### विद्यार्थ्यांनो, येथे करा अर्ज

पॉलिटेक्निक प्रवेशप्रक्रियेसाठी शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया आणि जिल्ह्यातल्या इतर तंत्रनिकेतन येथे प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी सुविधा केंद्र सुरू करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना प्रवेश अर्ज ऑनलाइन भरायचे आहेत. ऑनलाइन पद्धतीमध्ये दोन पर्याय आहेत. फॉर्म भरण्यासाठी मोबाइल क्रमांक आणि ई-मेल आयडी आवश्यक आहे. ऑनलाइन अर्ज नोंदणी मुदत २५ जून असून तात्पुरती गुणवत्तायादी २७ जून २०२४ रोजी प्रसिद्ध होणार आहे. तात्पुरत्या गुणवत्तायादीवर आक्षेप नोंदविण्यासाठीची मुदत ३० जूनपर्यंत असणार आहे. अंतिम गुणवत्तायादी २ जुलै रोजी https://poly24.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

### प्रवेशासाठी ही कागदपत्रे आवश्यक

दहावीची गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातप्रमाणपत्र, अनुसूचित जाती/अनुसूचित जमातीव्यतिरिक्त उर्वरित सर्व मागासवर्गीय उमेदवारांसाठी नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र (३१ मार्च २०२५ पर्यंत वैध), राष्ट्रीय व अधिवास प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक प्रवर्गासाठी (इडब्ल्यूएस) प्रमाणपत्र, दिव्यांगबाबतचे प्रमाणपत्र, सैन्यदलातील संवर्गातून प्रवेशासाठी माहिती पुस्तिकेत दिलेले सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेले प्रमाणपत्र, अल्पसंख्याकांसाठी प्रवर्गासाठीचे प्रमाणपत्र, आधार क्रमांक व संलग्न बँक खाते.

देशोन्नती

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे उद्‌घाटन




**गोंदिया :** कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक-युवतींना व्हावा या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकीत महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर महाविद्यालयामध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राची स्थापना करण्यात आली. जिल्ह्यातील १९ महाविद्यालयामध्ये सुरु केलेल्या 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्राचे' २० सप्टेंबर रोजी प्रधानमंत्री यांच्या हस्ते ऑनलाईन उद्‌घाटन करण्यात आले. शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातील कार्यक्रमाला प्रा. डॉ. चंद्रहास गोळघाटे, जिल्हा कौशल्य रोजगार विकास व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त रा.ना.माटे, आर.पी.कठाणे, प्राध्यापिका भाग्यश्री मेश्राम उपस्थिती होते. दुरदृश्य प्रणालीव्दारे आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहुन आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रात जास्तीत जास्त उमेदवारांनी नोंदणी करुन या याजनेचा लाभ घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

**एकोडी :** तालुक्यातील दांडेगाव येथील राजू भदाडे औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाद्वारे कौशल्य विकास या संकल्पेचा लाभ युवक-युवतींना व्हावा यासाठी प्रशिक्षण संस्थेत पंतप्रधान यांच्या हस्ते दृश्यम प्रणालीद्वारे आचार्य चाणक्य कौशल्य विभाग केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी जि.प. सदस्य अश्विनी पटले, के. झेड. भदाडे, पंकज मेश्राम, सरोदे, सरपंच राजकुमार बोपचे, पंकज मेश्राम, मिथून कटरे त्याच प्रमाणे सर्व शिक्षक वृंद व प्रशिक्षणार्थी, कर्मचारी वर्ग पालकवर्ग उपस्थित होते.

Gondia Edition
Sep 21, 2024 Page No. 8
Powered by: erelego.com

नवभारत

# शासकीय पॉलिटेक्निक कोर्स के लिए प्रवेश प्रक्रिया शुरू

## आवेदन करने की अंतिम तिथी 25 जून

■ गोंदिया, ब्यूरो. शैक्षणिक वर्ष 2024-25 के लिए राज्य तकनीकी शिक्षा विभाग द्वारा संचालित तकनीकी शिक्षा पाठ्यक्रम के लिए प्रवेश प्रक्रिया शुरू हो गई है. जिले में शासकीय व निजी तंत्रनिकेतन में 960 सीटें भरी जानी है तथा विद्यार्थी 25 जून 2024 तक ऑनलाइन आवेदन कर अपना प्रवेश सुनिश्चित कर लें, ऐसी अपील शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया के प्राचार्य सी.डी. गोलघाटे ने की है. विशेष यह है कि गोंदिया तंत्रनिकेतन संस्था डिजिटल क्लासरूम वाली एकमात्र संस्था है और इस संस्था में छात्र आधुनिक तकनीक की मदद से शिक्षा प्राप्त कर सकते हैं. गोंदिया जिले में चार पॉलिटेक्निक डिप्लोमा संस्था हैं. शासकीय पॉलिटेक्निक गोंदिया की प्रवेश क्षमता-360 सीटें, श्री लक्ष्मणराव मानकर कॉलेज ऑफ पॉलिटेक्निक आमगांव-180 सीटें, सी.एस. इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी देवरी-180 सीटें और गुरुकुल पॉलिटेक्निक नागरा-240 सीटें ऐसी प्रवेश क्षमता है. संस्था की 6 शाखाओं में प्रत्येक की प्रवेश क्षमता 60 छात्रों की है. इसमें मैकेनिकल इंजीनियरिंग - 60 सीटें, कंप्यूटर इंजीनियरिंग - 60 सीटें, सूचना प्रौद्योगिकी - 60 सीटें, परमाणु ऊर्जा और दूरसंचार इंजीनियरिंग - 60 सीटें, इलेक्ट्रिकल इंजीनियरिंग - 60 सीटें और सिविल इंजीनियरिंग - 60 सीटें शामिल हैं. उनमें से चार शाखाओं अर्थात मैकेनिकल इंजीनियरिंग, कंप्यूटर इंजीनियरिंग, सूचना प्रौद्योगिकी, परमाणु ऊर्जा और दूरसंचार इंजीनियरिंग को राष्ट्रीय प्रत्यायन बोर्ड, अखिल भारतीय तकनीकी शिक्षा परिषद (एआईसीटीई) नई दिल्ली से उच्च गुणवत्ता वाला शिक्षा प्रमाण पत्र प्राप्त हुआ है. कुल प्रवेश क्षमता का 70 प्रश. गोंदिया जिले के छात्रों के लिए और 30 प्रश. अन्य जिलों के छात्रों के लिए आरक्षित है.

### शुरू किए गए सुविधा केंद्र

- पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रिया के लिए शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया और जिले के अन्य तंत्रनिकेतन में प्रथम वर्ष पाठ्यक्रम के लिए सुविधा केंद्र शुरू किया गया है. छात्रों को प्रवेश पत्र ऑनलाइन भरना होगा. ऑनलाइन पद्धति में ई-स्क्रूटनी, फिजिकल स्क्रूटनी नाम से दो विकल्प हैं. फॉर्म भरने के लिए मोबाइल नंबर और ई-मेल आईडी जरूरी है.
- ऑनलाइन आवेदन पंजीकरण की अंतिम तिथि 25 जून 2024 है और अंतिम मेरिट सूची 27 जून 2024 को जारी की जाएगी. अंतिम मेरिट सूची पर आपत्ति दर्ज कराने की अंतिम तिथि 30 जून 2024 है. अंतिम मेरिट सूची 2 जुलाई 2024 को वेबसाइट



Gondia Edition
Jun 1, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com

नवभारत
नागपुर, शनिवार 29 जून 2024
गोंदिया

# पॉलिटेक्निक की अवधि आगे बढ़ाई

■ गोंदिया, ब्यूरो. पॉलिटेक्निक पाठ्यक्रम प्रवेश प्रक्रिया में ऑनलाइन आवेदन पत्र जमा करने की अंतिम तिथि 25 जून तक बढ़ा दी गई थी. संशोधित शेड्यूल के मुताबिक छात्र अब 9 जुलाई तक ऑनलाइन आवेदन भर सकेंगे. 29 मई से शुरू हुई रजिस्ट्रेशन प्रक्रिया में अब तक 1 लाख 27 हजार छात्रों ने रजिस्ट्रेशन कराया है और 1 लाख 4 हजार 331 छात्रों ने फीस का भुगतान किया है. 10वीं रिजल्ट के बाद तकनीकी शिक्षा संचालनालय द्वारा पॉलिटेक्निक पाठ्यक्रमों के शैक्षणिक वर्ष 2024-25 के लिए प्रवेश प्रक्रिया जारी है. इस साल ऑनलाइन आवेदन प्रक्रिया 29 मई से शुरू की गई. प्रवेश प्रक्रिया की अनुसूची के अनुसार, ऑनलाइन आवेदन भरने, दस्तावेज सत्यापन, आवेदन पुष्टिकरण प्रक्रिया के लिए 25 जून तक की समय सीमा दी गई थी. कार्यकाल समाप्त होने के कारण संचालक कार्यालय ने 25 जून को विस्तार के साथ संशोधित कार्यक्रम की घोषणा की. छात्र 9 जुलाई तक ऑनलाइन आवेदन कर सकते हैं. इस दौरान दस्तावेज सत्यापन, आवेदन पुष्टिकरण प्रक्रिया पूरी की जा सकती है. इस वर्ष ई-स्क्रूटनी, फिजिकल स्क्रूटनी की सुविधा उपलब्ध है. योग्यता सूची सीएपी के विभिन्न राउंड के लिए विकल्प आवेदन भरने, सीएपी सीट आवंटन, सीट की स्वीकृति, आवंटित संस्थान में उम्मीदवार की उपस्थिति, प्रवेश की अंतिम तिथि आदि के संबंध में आगे की अनुसूची फाइनल जारी होने के बाद घोषित की जाएगी, ऐसी जानकारी शासकीय तकनीकी संस्था, गोंदिया के प्राचार्य डा. सी.डी. गोलघाटे ने दी हैं.

## 9 जुलाई तक किए जा सकेंगे आवेदन

### लाखों छात्रों के आवेदन

- पाठ्यक्रम के लिए रजिस्ट्रेशन प्रक्रिया करीब एक महीने से चल रही है. 25 जून को शाम तक 1 लाख 27 हजार 553 विद्यार्थियों ने प्रवेश के लिए ऑनलाइन आवेदन किया है. इनमें से 1 लाख 4 हजार 331 छात्रों ने फीस का भुगतान कर दिया है.
- प्रवेश के तीन राउंड होंगे. राज्य के 390 संस्थानों में लगभग 1 लाख 5 हजार प्रवेश क्षमता है. प्रवेश के लिए 316 आवेदन सुविधा केंद्र हैं. छात्रों के लिए महत्वपूर्ण निर्देशों के लिए https://dte.maharashtra.gov.in कि वेबसाइट पर विजिट करना चाहिए, ऐसे संचालनालय ने स्पष्ट किया है.

### संशोधित अनुसूची

- ऑनलाइन आवेदन भरना : 29 मई से 9 जुलाई तक
- दस्तावेज सत्यापन, आवेदन निर्धारण : 29 मई से 9 जुलाई
- औपबंधिक मेरिट सूची : 11 जुलाई
- मेरिट सूची पर आपत्ति : 12 जुलाई से 14 जुलाई तक
- अंतिम मेरिट सूची : 16 जुलाई

Gondia Edition
Jun 29, 2024 Page No. 4
Powered by: erelego.com



प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात बोलताना पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम.

## गोंदिया येथील तंत्रनिकेतन राज्यातील पहिली संस्था

गोंदिया येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे जिल्हा वार्षिक योजनेमधून २० वर्ग खोल्यांचे डिजीटायजेशन करण्यात आले आहे. या अत्याधुनिकीकरणामुळे मुलांना उच्च दर्जाचे तंत्रशिक्षण घेणे सोपे झाले आहे. गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन ही संपूर्ण डिजीटायजेशन झालेली राज्यातील पहिली संस्था आहे. याबद्दल संस्थेचे प्राचार्य, प्राध्यापक व विध्यार्थ्यांचे पालकमंत्र्यांनी कौतुक केले. गोंदिया जिल्ह्यातील शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी वर्षभरात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिबिर आयोजित केले जातील असे सांगितले.

ई-सिगारेट बंदीबाबतच्या १८ सप्टेंबर २०१९ च्या अध्यादेशाची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता तंबाखूमुक्तीती शपथ घेण्यात आली. संचालन मंजुश्री देशपांडे यांनी केले. कार्यक्रमाला अपर पोलिस अधीक्षक नित्यानंद झा, उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी चंद्रभान खंडाईत, उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील यांच्यासह विविध विभागातील कार्यालय प्रमुख उपस्थित होते.



# ऑनलाइन टिफीन ॲप, दुकानांना ऑनलाइन व्हिजन प्रयोग ठरले लक्षवेधक

स्पर्धा

गोंदिया

- शासनाने दिले एक लाखाचे बीजभांडवल : स्टार्टअपसाठी युवकांना मिळतेय बळ

विद्यार्थी व युवकांमध्ये अनेक सुप्त गुण व कल्पकता असते. त्याला योग्य वाव दिल्यास त्यांच्या कल्पकतेचे सोने होऊ शकते. शासनाने नेमका हाच धाग पकडत अभियांत्रिकी व तंत्रनिकेतनचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमधील कल्पकतेला स्पर्धेच्या माध्यमातून वाव देऊन त्यातून चांगले स्टार्टअप सुरू करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे.

४ फेब्रुवारी रोजी गोंदिया येथे प्रगती बहुउद्देशीय संस्था, खमारी गोंदिया व करंजेकर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, साकोली यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्टार्टअप २०२४' स्पर्धा घेण्यात आली. यात गोंदिया येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या ऑनलाइन टिफीन ॲप आणि दुकानांना ऑनलाइन व्हिजन देणाऱ्या संकल्पना लक्षवेधक ठरल्या.

या स्पर्धेदरम्यान विविध विद्यार्थ्यांनी आपल्या व्यवसायाच्या नवीन कल्पना मांडल्या. गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाचा विद्यार्थी आविष्कार काळे याने स्थानिक व्यवसायांसाठी ऑनलाइन टिफीन व्यवस्थापनाची क्षमता अधोरेखित केली. त्यासाठी त्याला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक देण्यात आले.

याच महाविद्यालयाचा कुणाल

### स्टार्टअपसाठी मिळाला एक लाखाचा पुरस्कार

आविष्कार नरेंद्र काळे यानेसुद्धा ऑनलाइन टिफीन व्यवस्थापनाच्या कल्पनेबाबत पारितोषिक प्राप्त केले. या दोन्ही विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाकडून प्रत्येकी एक लाख रुपयांचे बीजभांडवल देण्यात आले आहे. त्यामुळे त्यांना हा प्रयोग यशस्वीपणे राबविण्यासाठी प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे.

### यांचे लाभले मार्गदर्शन

हे सर्व विद्यार्थी सध्या संगणक अभियांत्रिकी अंतिम वर्षाला शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. सी. डी. गोळघाटे, विभागप्रमुख प्रा. कृष्ण कुमार, प्रकल्प मार्गदर्शक प्रा. भाग्यश्री मेश्राम, प्रा. कृष्णकुमार, प्रा. झेड. जे. बल्लारे, विभागीय कर्मचारी व पालकांना दिले.

### ॲपची होणार ग्राहकांना मदत

या ॲपच्या मदतीने ग्राहकांना घरी बसून त्यांचे टिफीन निवडून बुक करण्याची सुविधा उपलब्ध होईल. त्यामुळे ग्राहकांचा वेळ आणि पैसा वाचण्यास मदत होणार [illegible] तसेच परिसरात मि[illegible]ध प्रकारच्या टिफीन [illegible] पदार्थांची चव घेता [illegible]

### डिजिटल भारताला चालना

देशोन्नती

# विद्यार्थ्यांनी केली विविध प्रयोगशाळेची पाहणी



देशोन्नती वृत्तसंकलन...

**तिरोडा** ■ बमलेश्वरी बिडी उत्पादक औद्योगिक संस्था येथे कार्यरत बिडी कामगारांच्या मुलांमध्ये तंत्रज्ञानाच्या वापर तसेच अभियांत्रिकी बाबतची जाणीव निर्माण व्हावी व त्या क्षेत्रात संधी मिळणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने बमलेश्वरी उत्पादक औद्योगिक सह संस्था यांनी पुढाकार घेऊन स्थानिक शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे जवळपास ५० विद्यार्थ्यांना घेऊन २१ डिसेंबर रोजी भेट दिली.

विद्यार्थ्यांनी संस्थेतील यंत्र अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, माहिती व तंत्रज्ञान, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी व अनुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी येथील विविध प्रयोगशाळेची पाहणी केली तसेच प्रत्येक प्रयोगशाळेचे उपकरणाबद्दल माहिती जाणून घेतली. संस्थेतील प्रा.खुरपुडे, प्रा.कापसे, प्रा.साहूसाकडे, प्रा.कुलथे, प्रा. पेठकर, प्रा. देशमुख, प्रा.पडवेकर यांनी त्यांच्या प्रयोगशाळेतील उपकरणांची माहिती दिली. तसेच संस्थेतील डिजिटल क्लासरूम, लँग्वेज स्टुडिओ व मुलांनी तयार केलेले प्रोजेक्ट मॉडल विद्यार्थ्यांना दाखविण्यात आले अनुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी चे विभागप्रमुख डॉ.प्रशांत शर्मा तसेच प्रा.एल.एन.राउत व प्रा.भूपेंद्र देशमुख यांनी संपूर्ण भेटीच्या नियोजन केले. औद्योगिक संस्थेचे विशेष कार्यकारी श्रीमती गझल खान व गोविंद चुटे यांनी संस्थेच्या आभार व्यक्त केला.

देशोन्नती

# शासकीय पॉलिटेक्क्रिकचे ५० टक्के प्रवेश पूर्ण

## गोंदियाला विद्यार्थ्यांची पसंती
## मागील वर्षीच्या तुलनेत २५ टक्के प्रवेश वाढले

देशोन्नती वृत्तसंकलन...

**गोंदिया** ■ तंत्रशिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल पाहता आतापर्यंत नागपूर शायकीय तंत्रनिकेतन संस्थेला विद्यार्थ्यांची पहिली पसंती होती. मात्र, सन २०२२-२३ या वर्षांत नागपूरसोबतच शासकीय तंत्रनिकेतन, गोंदियाला विद्यार्थी पसंती देत असून, यावर्षी आतापर्यंत सर्व विद्याशाखेत ५० टक्क्यांवर प्रवेश झाले आहेत. हा आकडा सन २०२१-२२ मध्ये केवळ २५ टक्के एवढा होता. तंत्रनिकेतन प्रवेशासाठी विद्यार्थी नागपूरनंतर गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन संस्थेला पसंतीर देत आहेत.



प्रथम वर्ष पॉलिटेक्क्रिक प्रवेश प्रक्रियामध्ये एकूण ३ फेऱ्या ऑनलाईन होतात आणि चौथी फेरी संस्था स्तरावर असते. सन २०२२-२३ च्या पॉलिटेक्क्रिक प्रवेशमधील प्रथम फेरीचे वाटप झालेले असून, विद्यार्थ्यांनी प्रवेशसुध्दा घेतले आहेत.

नागपूर विभागात पॉलिटेकनिक प्रवेशसाठी शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर ही स्वायत्त संस्था आल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रथम प्राधान्य या संस्थेला असते. सन २०२२-२३ च्या प्रथम वर्ष पॉलिटेक्क्रिक प्रवेश प्रक्रियेत यावर्षी नागपूर विभागात शासकीय तंत्रनिकेतन, नागपूरनंतर शासकीय तंत्रनिकेतन, गोंदियाला विद्यार्थी व पालकांची प्रथम पसंती मिळत आहे.

Deshonnati Edition
Sep 4, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

### तंत्रनिकेतन शाखेत 50 टक्के प्रवेश पूर्ण : अन्य फेरी बाकी

# विद्यार्थ्यांची गोंदियाला पसंती

**गोंदिया,** ब्युरो. तंत्र शिक्षणाकडे विद्यार्थ्यांचा वाढता कल पाहता आतापर्यंत नागपूर शासकीय तंत्रनिकेतन संस्थेला विद्यार्थ्यांची पहिली पसंती होती. मात्र, सन 2022-23 या वर्षांत नागपूर सोबतच शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाला विद्यार्थी पसंती देत असून यावर्षी आतापर्यंत सर्व विद्याशाखेत 50 टक्क्यांवर प्रवेश झाले आहेत. हा आकडा सन 2021-22 मध्ये केवळ 25 टक्के एवढा होता. तंत्रनिकेतन प्रवेशासाठी विद्यार्थी नागपूर नंतर गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन संस्थेला पसंती देत आहेत.

प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियामध्ये एकूण 3 फेरी ऑनलाइन होतात आणि चौथी फेरी संस्था स्थरावर असते. सन 2022-23 च्या पॉलिटेक्निक प्रवेशमधील प्रथम फेरीचे वाटप झालेले आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेशसुद्धा घेतले आहे. नागपूर विभागात पॉलिटेकनिक प्रवेशासाठी शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर ही स्वायत्त संस्था आल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रथम प्राधान्य या संस्थेला असते. सन 2022-23 च्या प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रियेत असे दिसून आले की, या वर्षी नागपूर विभागात शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर नंतर शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाला विद्यार्थी व पालकांची प्रथम पसंती आहे. शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथे 6 विद्याशाखाकरिता एकूण 360 विद्यार्थी प्रवेश क्षमता आहे. एकूण प्रवेश क्षमतेच्या 70 टक्के जागा गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता व 30 टक्के जागा हे इतर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरिता राखीव असतात. मागील वर्षी 2021-22 ला प्रथम वर्ष पॉलिटेक्निक प्रवेश प्रक्रीयाच्याच्या पहिल्या फेरीत एकूण जागाच्या 25 टक्के प्रवेश झाले होते.

2022-23 ला पहिल्या फेरीत हा आकडा दुप्पट होऊन जवळपास 50 टक्क्यांपर्यंत गेला आहे. यावरून असे निदर्शनास येते की, शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची पहली पसंत ठरत आहे. प्रथम फेरीमध्ये विशेष करून गोंदिया जिल्हा तसेच बाहेरील विद्यार्थी असे एकूण 325 विद्यार्थ्यांना शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया वाटप करण्यात आले. यापैकी 173 विद्यार्थ्यांनी प्रथम फेरीत प्रवेश घेतला आहे. त्यामुळे यावेळेस संस्थेची पूर्णच 360 प्रवेश क्षमता दुसऱ्या फेरीमध्येच पूर्ण होईल, अशी परिस्थिती आहे.




> महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबईतर्फे संस्थेच्या 100 टक्के विभागांना अतिउत्कृष्ट मानांकन असलेली गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकमेव संस्था आहे . प्लेसमेंटची संख्या सातत्याने वाढत असून मागील वर्षी 130 विद्यार्थ्यांना विविध जागतिक कंपनीमध्ये रोजगार प्राप्त झाला . शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथील सर्व विभाग अद्ययावत साहित्याने सुसज्ज आहेत . येथील प्राध्यापक वर्ग उच्च विद्याविभूषित व अनुभवी असल्याचा विद्यार्थ्यांना फायदा होत आहे .
>
> –सी .डी . गोळघाटे, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेत, गोंदिया

# शासकीय तंत्रनिकेतनला उत्कृष्ट संस्था मानांकन

## २४ संस्थामधून निवड, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ

देशोन्नती वृत्तसंकलन...

**गोंदिया ■** महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तर्फे मंडळाअंतर्गत येणाऱ्या सर्व पदविका अभ्यासक्रमाचे वार्षिक शैक्षणिक अवेक्षण करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक शैक्षणिक अवेक्षण मे महिन्यात करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई कडून नियुक्त विविध चमुनी गोंदिया व भंडारा जिल्हातील एकूण २४ संस्थाचे शैक्षणिक अवेक्षण केले. यात गोंदिया शासकीय तंत्र निकेतनच्या सर्व शाखा अत्युत्कृष्ट दर्जाच्या ठरल्या असून या संस्थेला उत्कृष्ट संस्था मानांकन प्राप्त झाले आहे. दरम्यान प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन डॉ. सी.डी.गोळघाट, विभाग प्रमुख, स्थापत्य अभियांत्रिकी डॉ. राम निबुदे, विभाग प्रमुख, अणुविध्युत व दूरसंचार अभियांत्रिका डॉ. प्रशांत शर्मा, विभाग प्रमुख, विद्युत अभियांत्रिका डॉ. गजानन गोतमारे, विभाग प्रमुख, यंत्र अभियांत्रिकी प्रा. गुलाब डाहोले, शैक्षणिक समन्वयक प्रा. स्वप्नील अंबादे हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व गुणवत्ता वाढीवर भर देणार आहेत.

शैक्षणिक अवेक्षण मध्ये मुलभूत सुविधा, विद्यार्थ्यांचा निकाल, प्लेसमेंट, प्रयोगशाळा, अधिव्याख्यात्यांची संख्या, अधिव्याख्यात्यांची शैक्षणिक अहर्ता, टीचिंग लर्निंग प्रोसेस व इतर सर्व मापदंड शाखा निहाय तपासले जातात. शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथे एकूण ६ शाखा आहेत, यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान यापैकी संगणक अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान शाखांना मागील शैक्षणिक अवेक्षण मध्ये अत्युत्कृष्ट दर्जा मिळाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक अवेक्षण यावर्षी करण्यात नाही आले. यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी या शाखांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता शैक्षणिक अवेक्षण करण्यात आले. यामध्ये सर्व शाखांना अत्यकृष्ट दर्जा प्राप्त झाला. गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील सर्व ६ शाखाना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई तर्फे अत्युत्कृष्ट दर्जा देण्यात आलेले आहे. गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील सर्व संस्थामधील सर्व शाखा अत्युत्कृष्ट असलेले शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया ही एकमेव संस्था आहे. अशी माहिती शैक्षणिक सह-समन्वयक प्रा. नितीन गुल्हाणे यांनी दिली.



नवभारत

शिक्षा गोंदिया व भंडारा के 24 संस्थानों में से विविध मापदंडों पर चुना गया

# तंत्रनिकेतन को उत्कृष्ट नामांकन



■ **गोंदिया,** ब्यूरो. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडल मुंबई द्वारा मंडल अंतर्गत सभी पदविका (डिप्लोमा) पाठ्यक्रम की वार्षिक शैक्षणिक समीक्षा की जाती है. शैक्षणिक वर्ष 2021-22 के लिए वार्षिक शैक्षणिक समीक्षा मई महीने में की गई. जिसमें महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडल मुंबई द्वारा नियुक्त विभिन्न टीमों ने गोंदिया व भंडारा जिले के कुल 24 संस्थानों की शैक्षणिक समीक्षा की. इसमें गोंदिया शासकीय तंत्र निकेतन की सभी शाखाओं का दर्जा उत्कृष्ट ठहराया गया है. जिससे संस्था को नामांकन प्राप्त हुआ है. इस बीच शासकीय तंत्रनिकेतन के प्राचार्य डा. सी.डी. गोलघाट, विभाग प्रमुख स्थापत्य अभियांत्रिकी डा. राम निंबुदे, विभाग प्रमुख अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी डा. प्रशांत शर्मा, विभाग प्रमुख विद्युत अभियांत्रिकी डा. गजानन गोतमारे, विभाग प्रमुख यंत्र अभियांत्रिकी डा. गुलाब डाहोले, शैक्षणिक समन्वयक प्रा. स्वप्निल अंबादे यह विद्यार्थियों को शैक्षणिक व गुणवत्ता वृद्धि पर जोर देंगे.

## उल्लेखनीय शिक्षण का आया सुखद परिणाम

गोंदिया के पॉलिटेक्निक में कुल 6 शाखाएं हैं. यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, कम्प्यूटर अभियांत्रिकी, सूचना तंत्रज्ञान आदि का समावेश है. इसमें से कम्प्यूटर अभियांत्रिकी व सूचना तंत्रज्ञान शाखा को गत वर्ष शैक्षणिक समीक्षा में अतिवृष्ट दर्जा मिलने से उनकी शैक्षणिक समीक्षा इस वर्ष नहीं की गई. यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूर संचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी इन शाखाओं के शैक्षणिक वर्ष 2021-22 के लिए शैक्षणिक समीक्षा की गई. इसमें सभी शाखाओं को उत्कृष्ट दर्जा प्राप्त हुआ है. उल्लेखनीय है कि गोंदिया व भंडारा जिले की सभी संस्थाओं में सभी शाखाओं में उत्कृष्ठ कार्य करने वाली शासकीय तंत्र निकेतन गोंदिया यह एकमात्र संस्था है. यह जानकारी शैक्षणिक सह समन्वयक प्रा. नितीन गुल्हाने ने दी.

शैक्षणिक समीक्षा में मूलभूत सुविधा, विद्यार्थियों का परिणाम, प्लेसमेंट, प्रयोगशाला, अधिव्याख्याताओं की संख्या, अधिव्याख्याताओं की शैक्षणिक योग्यता, टीचिंग लर्निंग प्रोसेस व अन्य सभी मापदंडों की शाखा निहाय जांच की जाती है.

Gondia Edition
03-september-2022 Page No. 1
epaper.enavabharat.com

लोकमत

# गोंदिया शासकीय तंत्रनिकेतनला मिळाले उत्कृष्ट संस्था मानांकन

## २४ संस्थांमधून निवड : सर्व शाखा अद्ययावत, शैक्षणिक गुणवत्तेत वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळतर्फे (मुंबई) येणाऱ्या सर्व पदविका अभ्यासक्रमाचे वार्षिक शैक्षणिक अवेक्षण करण्यात येते. त्यानुसार, शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक शैक्षणिक अवेक्षण मे महिन्यात करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळांकडून नियुक्त विविध चमुनी गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकूण २४ संस्थांचे शैक्षणिक अवेक्षण केले. यात गोंदिया शासकीय तंत्रनिकेतनच्या सर्व शाखा अत्युत्कृष्ट दर्जाच्या ठरल्या असून, या संस्थेला उत्कृष्ट संस्था मानांकन प्राप्त झाले आहे. शैक्षणिक अवेक्षणमध्ये मूलभूत सुविधा, विद्यार्थ्यांचा निकाल, प्लेसमेंट, प्रयोगशाळा, अधिव्याख्यात्यांची संख्या, अधिव्याख्यात्यांची शैक्षणिक अहर्ता, टीचिंग लर्निंग प्रोसेस व इतर सर्व मापदंड शाखानिहाय तपासले जातात.



येथील शासकीय तंत्रनिकेतनमध्ये एकूण ६ शाखा आहेत. यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान यापैकी संगणक अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान शाखांना मागील शैक्षणिक अवेक्षणमध्ये अत्युत्कृष्ट दर्जा मिळाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक अवेक्षण यावर्षी करण्यात नाही आले. यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी या शाखांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता शैक्षणिक अवेक्षण करण्यात आले. यामध्ये सर्व शाखांना अत्यकृष्ट दर्जा प्राप्त झाला. गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील सर्व ६ शाखांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळतर्फे अत्युत्कृष्ट दर्जा देण्यात आलेला आहे. गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील सर्व संस्थामधील सर्व शाखा अत्युत्कृष्ट असलेले शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया ही एकमेव संस्था आहे. अशी माहिती शैक्षणिक सहसमन्वयक प्रा. नितीन गुल्हाणे यांनी दिली.

Hello Gondia
Page No. 3 Sep 02, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# गोंदिया शासकीय तंत्रनिकेतनला उत्कृष्ट संस्था मानांकन

## २४ संस्थांमधून निवड : सर्व शाखा अद्ययावत

**सकाळ वृत्तसेवा**

गोंदिया, ता. १ : महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबईतर्फे मंडळाअंतर्गत येणाऱ्या सर्व पदविका अभ्यासक्रमाचे वार्षिक शैक्षणिक अवेक्षण करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता वार्षिक शैक्षणिक अवेक्षण मे महिन्यात करण्यात आले. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबईकडून नियुक्त विविध चमुंनी गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील एकूण २४ संस्थांचे शैक्षणिक अवेक्षण केले. यात गोंदिया शासकीय तंत्र निकेतनच्या सर्व शाखा उत्कृष्ट दर्जाच्या ठरल्या असून या संस्थेला उत्कृष्ट संस्था मानांकन प्राप्त झाले आहे.

शैक्षणिक अवेक्षणमध्ये मुलभूत सुविधा, विद्यार्थ्यांचा निकाल, प्लेसमेंट, प्रयोगशाळा, अधिव्याख्यात्यांची संख्या, अधिव्याख्यात्यांची शैक्षणिक अहर्ता, टीचिंग लर्निंग प्रोसेस व इतर सर्व मापदंड शाखानिहाय तपासले जातात. शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे एकूण ६ शाखा आहेत. यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी, स्थापत्य अभियांत्रिकी, संगणक अभियांत्रिकी, माहिती तंत्रज्ञान यापैकी संगणक अभियांत्रिकी आणि माहिती तंत्रज्ञान शाखांना मागील शैक्षणिक अवेक्षणमध्ये उत्कृष्ट दर्जा मिळाल्यामुळे त्यांचे शैक्षणिक अवेक्षण यावर्षी करण्यात आले नाही.

यंत्र अभियांत्रिकी, अणुविद्युत व दूरसंचार अभियांत्रिकी, विद्युत अभियांत्रिकी व स्थापत्य अभियांत्रिकी या शाखांचे शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता शैक्षणिक अवेक्षण करण्यात आले. यामध्ये सर्व शाखांना उत्कृष्ट दर्जा प्राप्त झाला. गोंदिया शासकीय तंत्रनिकेतन संस्थेतील सर्व सहा शाखांना महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबईतर्फे उत्कृष्ट दर्जा देण्यात आला आहे. गोंदिया व भंडारा जिल्ह्यातील सर्व संस्थांमधील सर्व शाखा उत्कृष्ट असलेले शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया ही एकमेव संस्था आहे. अशी माहिती शैक्षणिक सह-समन्वयक प्रा. नितीन गुल्हाणे यांनी दिली.

Nagpur, Gondiya-Today
02/09/2022 Page No. 4

रिजन अपडेट.
लोकमत
epaper.lokmat.com
नागपूर, सोमवार, दि. १२ जुलै २०२१

# विद्यार्थ्यांनी तयार केले सर्वात स्वस्त पोर्टेबल व्हेंटिलेटर

## केवळ सहा हजार रुपयात मिळणार : सहज उपलब्ध साधनांचा केला वापर

रिसर्च स्टोरी

प्रा. सागर काटेखाये
लोकमत न्यूज नेटवर्क

साखरीटोला (गोंदिया) : कोरोना संसर्गाच्या काळात ऑक्सिजन आणि व्हेंटिलेटरची सुविधा न मिळाल्याने अनेक रुग्णांचा मृत्यू झाला. त्यामुळेच दुसऱ्या लाटेत या साधनाची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. गोंदिया येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या काही विद्यार्थ्यांनी सर्वात कमी किमतीचे पोर्टेबल व्हेंटिलेटर तयार केले आहे.

व्हेंटिलेटर खरेदी करणेसुद्धा सामान्यांच्या आवाक्यात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या या पोर्टेबल व्हेंटिलेटरची सध्या सर्वत्र चर्चा आहे.



या मॉडेलला राज्य स्तरावर पार पडलेल्या ऑनलाइन विज्ञान प्रदर्शनीत प्रथम क्रमांकसुद्धा मिळाला आहे.

यावर्षी कोरोनाची रुग्णसंख्या वाढू लागताच शासकीय यंत्रणेची धावपळ होऊ लागली. ऑक्सिजनचा पुरवठा करण्यात शासनाची दमछाक झाली. ऑक्सिजनअभावी अनेक जण मृत्यूच्या दारात गेले. काहींनी घरीच राहून जीव गमावला. ही भीषण परिस्थिती सगळ्यांनी अनुभवली. हीच बाब लक्षात घेऊन सर्वसामान्य माणसाला परवडेल व घरीच राहून स्वतःचा उपचार करता येईल व सरकारी यंत्रणेवरील ताण कमी करण्याच्या उद्देशाने गोंदिया येथील शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सर्वात कमी किमतीचे पोर्टेबल व्हेंटिलेटर तयार केले. या मॉडेलला आरडीनो किट, एम्बू बॅग, रॅक आणि पिनियम मेकॅनिझम, एलसीडी डिस्प्ले, ऑक्सिमीटर आदी साहित्य लावण्यात आले.

### व्हेंटिलेटरचे वजन केवळ १ किलो

- विशेषतः व्हेंटिलेटर केवळ एक किलो वजनाचे आहे. त्यामुळे सहज उचलून नेता येते. एका मिनिटात चार लीटर ऑक्सिजन पुरवू शकते. त्यामुळे अनेक रुग्णांचा जीव वाचविण्यात अतिशय फायदेकारक आहे. याला केवळ १२ व्होल्ट वीज लागते.

### मोबाईल चार्जरवर चार्ज करणे शक्य

- मोबाइल चार्जरवर व्हेंटिलेटर चार्ज होते. बॅटरीवरसुद्धा चार्ज होऊ शकते. याची किमत केवळ ६,६५० रुपये आहे. व्हेंटिलेटर तयार करण्यात हर्ष नरेश अग्रवाल, लीना पटले, दीपक कल्चर, प्रिया दावणे, विशाल सिहमारे, सावित्री मच्छिरके या विद्यार्थ्यांचा सहभाग आहे. सेंट व्हिंसेंट पलोटी कॉलेज नागपूर येथे झालेल्या ऑनलाइन विज्ञान प्रदर्शनीत हे व्हेंटिलेटर प्रथम क्रमांकाचे मानकरी ठरले.

### हर्ष अग्रवालचा दुसरा प्रयोग

- साखरीटोला येथील रहिवासी असलेला हर्ष अग्रवाल या विद्यार्थ्याने यापूर्वी भंगारात पडलेल्या लुनापासून सिंगलसीट बाईक तयार केली होती. या बाईकची चर्चासुध्दा महाराष्ट्रात सर्वत्र झाली होती. आता त्याने आपल्या वर्गमित्रांच्या मदतीने पोर्टेबल व्हेंटिलेटर तयार करून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रमात एकत्र आलेले बनाथर जि.प.चे शाळेचे विद्यार्थी.

# व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : तालुक्यातील बनाथर येथील जि.प.हाईस्कूल येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयातर्फे व्यवसाय मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक व्ही. एस. फुलबांधे हे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून व्याख्याता एस.एन.कोटक्र, आर.डी. गोसावी उपस्थित होते. या वेळी सुनिता श्रीवास्तव, सुनील तंगडपल्लीवार, धनुसकर, झामेश ठाकरे, ठाकरे, नान्हे, बसेने, कल्पेश डोहरे, प्रकाश बाभरे, परिहार, बर्वे, पटले उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वतीच्या छायाचित्राला माल्यार्पण करु न करण्यात आली.

प्रमुख मार्गदर्शक कोटक्र व गोसावी यांनी विद्यार्थ्यांना दहावी परीक्षेनंतर कोण-कोणत्या क्षेत्रात संधी उपलब्ध आहेत याची माहिती दिली. पॉलीटेकनिक करण्याचे काय फायदे आहेत. त्यातून रोजगार कसा प्राप्त होतो यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन करून आभार झामेश ठाकरे यांनी मानले.

लोकमत

# दहावीनंतर तंत्रनिकेतन हा उत्तम पर्याय

## सी. डी. गोळघाटे : तंत्रनिकेतन प्रवेशाची संधी : प्लेसमेंटची दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : शाळा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतन प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून, तंत्रनिकेतनकडे विद्यार्थ्यांचा कल वाढावा यासाठी व या माध्यमातून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी तंत्रनिकेतनमध्ये प्रवेश घ्यावा, यासाठी स्कूल कनेक्ट कार्यक्रमाविषयी व्यापक प्रमाणात जनजागृती करावी, असे शासकीय तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. सी. डी. गोळघाटे यांनी केले.

गोंदिया, तिरोडा व गोरेगाव तालुक्यांतील शिक्षकांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती. या वेळी ते बोलत होते. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या स्कूल कनेक्ट उपक्रमात जिल्ह्यातील १७७ शासकीय, निमशासकीय तसेच खासगी शाळांना सहभागी करून घेण्यात आले होते. दहावी झाल्यानंतर करिअरचे अनेक पर्याय विद्यार्थ्यांसमोर आहेत. मात्र तंत्रनिकेतन हा उत्तम पर्याय असून या क्षेत्रात करिअर करताना नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, असे त्यांनी सांगितले. औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि तंत्रशिक्षण यामधील फरक या वेळी त्यांनी समजावून सांगितला. शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे सहा विद्याशाखा असून येथे शिक्षणाची उत्तम सोय उपलब्ध आहे. या ठिकाणी लागणाऱ्या शैक्षणिक शुल्काबाबतही प्राचार्यांनी माहिती दिली.

मुख्याध्यापक एन. एस. कुंभारे, यू. एस. चिंधालोरे, व्ही. एस. फुलबांधे, व्ही. एस. माने, ए. बी. हरडे, आर. वाय. कटरे, एम. एल. पटले, के. एस. वैद्य, आर. डी. गेडाम व ए. जी. टेंभरे प्रत्यक्ष उपस्थित होते. शासकीय तंत्रनिकेतनच्या विद्यार्थ्यांची विविध कंपनीत झालेल्या प्लेसमेंटची माहिती अनुविद्युत व दूरसंचार विभागाचे अधिव्याख्याता भूपेंद्र देशमुख यांनी दिली.

### अभियांत्रिकी डिप्लोमा केल्यानंतर संधी कुठे

- अभियांत्रिकी डिप्लोमा केल्यानंतर भविष्यात कुठल्या कुठल्या संधी उपलब्ध आहेत याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले. सरकारच्या मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया व स्किल इंडिया योजनेतही संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांची रुची वाढविण्यास मदत

- स्कूल कनेक्ट हा उपक्रम विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारा असून त्यांच्यामध्ये तंत्रनिकेतनविषयी जागरूकता निर्माण करावी. शाळेत प्रकल्प प्रदर्शन, विज्ञान प्रदर्शन, कोडिंग, ड्रोन, रोबोटिक्स व इलेक्ट्रॉनिक या विषयावर प्रदर्शन आयोजित करण्यात यावेत, असे सांगितले. शासकीय तंत्रनिकेतन गोंदियाचे इलेक्ट्रॉनिक आणि दूरसंचार अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख तसेच स्कूल कनेक्ट उपक्रमाचे समन्वयक प्रशांत शर्मा यांनी केले. शाळेच्या विद्यार्थ्यांची सहल शासकीय तंत्रनिकेतन येथे घेऊन यावी, ज्यामुळे विद्यार्थ्यांना या विषयातील रुची वाढेल असेही सांगितले.

Hello Gondia
Page No. 2 Jun 29, 2022
Powered by: erelego.com

लोकमत

# तंत्रनिकेतनमध्ये राज्यातील प्राध्यापकांचे प्रशिक्षण

## एका आठवड्याचे प्रशिक्षण : प्राध्यापकांचा ऑनलाईन सहभाग, विविध विषयावर चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : राज्य तसेच संपूर्ण जगभर कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु असताना संपूर्ण राज्यातील शैक्षणिक संस्थेतील कामे बंद आहेत. मात्र अशाही परिस्थितीत महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग (मुंबई) यांच्या संयुक्तवतीने येथील शासकीय तंत्रनिकेतन मार्फत संपूर्ण महाराष्ट्रातील तंत्रनिकेतन संस्था तसेच फार्मसी कॉलेजमधील प्राध्यापकांसाठी ऑनलाईन 'एनबीए ई-सार प्रीपरेशन' या विषयावर नुकतेच एका आठवड्याचे प्रशिक्षण घेण्यात आले. येथील प्राचार्य डॉ.सी.डी. गोळघाटे यांच्या मार्गदर्शनात येथील प्राध्यापकांनी सिस्को वेबेक्स, गुगल क्लासरुम, व्हॉट्सअॅप, गुगलमीट या डिजिटल माध्यमांचा वापर करुन प्रशिक्षण यशस्वी केले. प्रशिक्षणात एनबीएसाठी तयारी, नोंदणी, सीओ. पीओ. मॅपिंग व ईसार क्रायटेरिया, डॉक्युमेंट अशा अनेक विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षणास संस्थेचे प्राचार्य डॉ.गोळघाटे, एन.बी.ए. समन्वयक डॉ.जी.व्ही. गोटमारे, शैक्षणिक समन्वयक प्रा.एल.एन. राऊत यांनी वेगवेगळ्या विषयांवर व्याख्यान दिले. तर बाहेरील संस्थेतील तज्ज्ञ व्याख्याते डॉ.एस.डब्लू. राजूरकर, डॉ.जी.के. आवारी, डॉ.एस.बी. इंगोले, डॉ.आर.एम. महारिर, प्रा.एस.डी. अंबादे यांनीही मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाची सांगता एम.एसबी.टी.ई (मुंबई) उपसचिव प्रा.यु.टी. नागदेवे यांच्या मार्गदर्शनाने झाली.

Hello Gondia
Page No. 4 Jun 27, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

# शासकीय तंत्रनिकेतन येथे मेडिटेशनचे वर्ग

लोकमत न्यूज नेटवर्क

**गोंदिया :** स्थानिक शासकीय तंत्रनिकेतन येथे २७ ते २९ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी ९ ते १० या वेळात दैनंदिन जीवनात योगा मेडिटेशनचा अभ्यास तसेच व्यक्तिमत्व विकास व्हावा, या हेतूने हार्टफुलनेस मेडिटेशन इंस्टिट्यूट या संस्थेकडून योगा मेडिटेशनचे वर्ग माहिती तंत्रज्ञान विभागाद्वारे विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी घेण्यात आले. प्राचार्य डॉ. सी. डी. गोळघाटे यांनी योगा मेडिटेशन याबाबतचे महत्त्व समजावून सांगितले.या वेळी माहिती तंत्रज्ञान विभागाचे विभाग प्रमुख एल. डी. अग्रवाल, डी. डी. अग्रवाल, एस. के. मेश्राम, एस.एम.रुडसमुद्र, पी.एस.नवघरे, व्ही.आर.मोरे, सतीश कोहळे यांचे सहकार्य केले. प्रशिक्षक म्हणून हेमंत परमार, विनिता शर्मा, श्वेता रहांगडाले उपस्थित होते. संचालन एम.एस.राठौड यांनी केले.

Hello Gondia
Page No. 3 Mar 05, 2020
Powered by: erelego.com

नव राष्ट्र

# योगा व मेडिटेशन प्रशिक्षण

**गोंदिया.** येथील शासकीय तंत्रनिकेतन येथे 27 ते 29 फेब्रुवारी या कालावधीत सकाळी 9 ते 10 वाजतापर्यंत दैनंदिन जिवनात योगा व मेडिटेशनचा अभ्यास तसेच व्यक्मिमत्व विकास व्हावा. या हेतुने 'हार्टफुलनेस मेडिटेशन इंस्टिटयूट' प्रशिक्षणाचे आयोजन माहिती तंत्रज्ञान विभागाद्वारे करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला होता. यावेळी प्राचार्य डॉ. सी. डी. गोळघाटे यांनी योगा व मेडिटेशन याबाबतचे महत्त्व समजून सांगितले.

याप्रसंगी प्रशिक्षक म्हणून हेमंत परमार, विनीता शर्मा, श्वेता रहांगडाले उपस्थित होते. संचालन एम. एस. राठोड यांनी केले. प्रशिक्षणसाठी माहिती तंत्रज्ञान विभागाचे विभागप्रमुख एल. डी. अग्रवाल, डी. डी. अग्रवाल, एस. के. मेश्राम, एस. एम. रूडसमुद्र, पी. एस. नवघरे, व्ही. आर.मोरे, सतिश कोहळे यांनी सहकार्य केले.

Navarashtra Gondia Edition
5 Mar, 2020 Page No. 4

# व्यावसायिक क्षेत्रातील अभ्यासक्रमावर मंथन



बैठकीत व्यावसायिक अभ्यासक्रमावर चर्चा करताना सी.पी.साहू, सी.डी.गोळघाटे, विनोद मोहितकर, एन.डब्ल्यू.बेसेकर,

लोकमत न्यूज नेटवर्क

**गोंदिया :** जिल्ह्यातील सर्व ४ संलग्नित संस्थाकरीता विविध उद्योग क्षेत्रातील, शासकीय विभागातील १४ सदस्य असलेल्या समन्वय समितीची बैठक शासकीय तंत्रनिकेतन विद्यालयाचे प्राचार्य सी.डी.गोळघाटे यांच्या मार्गदर्शनाखाली तिरोडा येथील अदानी प्रकल्पात सोमवारी पार पडली. सभेला अदानी पॉवर स्टेशन हेड व सदस्य सचिव सी.पी.साहू उपस्थित होते.

या बैठकीत सर्व तंत्रनिकेतन मधील प्राचार्यांनी त्यांच्या अंतर्गत येत असलेल्या द्वितीय वर्षातील एकूण ४९३ विद्यार्थ्यांची विविध उद्योग धंद्यामध्ये सहा आठवडयाच्या प्रशिक्षणाकरीता नोंदणी केल्याचे सांगितले. जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांची प्रशिक्षणासाठी नोंदणी करुन शिकत असताना व्यावसायीक क्षेत्रातील प्राविण्य कसे प्राप्त करता येईल या विषयावर चर्चा करण्यात आली.

राज्य तंत्रशिक्षण मंडळा संचालक डॉ. विनोद मोहितकर यां जो उद्देश ठेवून आय-स्कीम अभ्यासक्रम अंमलात आणला आ त्यासाठी प्रा.सी.डी.गोळघा एन.डब्ल्यू.बेसेकर, एन.एल. लांजेव विजय गांधेवार, पी. के. सोनकांबळे सहकार्य करीत आहेत.

# नवराष्ट्र

## तांत्रिक शिक्षणासह व्यवसायावर मार्गदर्शन



**अर्जुनी मोरगाव.** तालुक्यातील मक्काटोला येथील पंचशील हायस्कूल, विज्ञान व कला कनिष्ठ महाविद्यालयात 4 जानेवारीला इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक शिक्षण व व्यवसाय मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. डी. मेश्राम होते. प्रमुख मार्गदर्शक प्रा. के. आर. कछीयावाले, प्रा. ओ. एस. चव्हाण हे होते. कार्यक्रमाचे संचालन एन. आर. रामटेके यांनी केले.

Gondia Edition
Jan 6, 2020 Page No. 3

# 'स्कूल कनेक्ट' योजनेतून विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाचे धडे

### आता यंत्र, विद्युत व स्थापत्य शाखांकडेही मुलींचा कल



[illegible]

### गोंदियाच्या मुली सांभाळतात कंपनी

[illegible]

### दरवर्षी 80 विद्यार्थ्यांची प्लेसमेंट

[illegible]



[illegible]

# 'विद्यार्थियों को टेक्निकल क्षेत्र में करियर बनाने के लिए करें प्रेरित'

## शासकीय तंत्रनिकेतन में हुई एक दिवसीय कार्यशाला में शिक्षाधिकारी कवचे ने किया मार्गदर्शन

ब्यूरो । गोंदिया

शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया में 7 जून को शिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रफुल कवचे की अध्यक्षता में आयोजित एक दिवसीय कार्यशाला में विद्यार्थियों को टेक्निकल एज्युकेशन का महत्व समझाने तथा उन्हें अपना करियर टेक्निकल क्षेत्र में बनाने के लिए प्रेरित करने संबंधी मार्गदर्शन किया। इस समय शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया के प्राचार्य डा. सी. गोडघाटे ने कार्यशाला का समन्वयक पद स्वीकार कर महाराष्ट्र सरकार द्वारा निर्देशित इस कार्यशाला की प्रस्तावना, रूपरेखा व उद्देश्य पर चर्चा की।उन्होंने बताया कि विद्यार्थियों के जीवन में एक शिक्षक का कितना महत्व होता है व किसी भी देश की उन्नति में तंत्रशिक्षण (टेक्निकल एज्युकेशन) का कितना योगदान हैं। इस समय अपने संस्था के बारे में जानकारी देते हुए प्राचार्य डा. सी.डी. गोडघाटे ने बताया कि हमारी संस्था में कुल 6 शाखाएं सिविल, मैकेनिकल, इलेक्ट्रिकल, इंफॉर्मेशन टेक्नोलॉजी, कम्प्यूटर टेक्नोलॉजी और इेक्ट्रॉनिक व टेलीकम्युनिकेशन है। सभी शाखाओं



में कुल 360 विद्यार्थियों की प्रवेश क्षमता हैं। इस समय शिक्षण विस्तार अधिकारी अशोक बरईकर व एम.एल. मेश्राम ने भी अपने विचार रखे। अपने अध्यक्षीय संबोधन में शिक्षणाधिकारी प्रफुल कवचे ने कहा कि किस तरह से विद्यार्थियों में तंत्रशिक्षण की जागरूकता लाने के लिए कदम उठाएं जा सकते हैं और उन्होंने शासकीय तंत्रनिकेतन गोदिया का मुआयना किया। कार्यशाला के अंतिम पड़ाव चर्चासत्र में कावराबांध जिप हाईस्कूल के मुख्याध्यापक ओ.सी. गुप्ता ने भी अपने विचार व्यक्त कर विद्यार्थियों को मार्गदर्शन किया। संचालन व आभार प्रदर्शन भूपेंद्र देशमुख ने किया।

**QUICK NEWS**

# शासकीय तंत्रनिकेतनमध्ये मुलभूत व वर्तन सुरक्षा मार्गदर्शन

**गोंदिया.** येथील शासकीय तंत्र निकेतनमध्ये अंतिम वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुलभूत व वर्तन सुरक्षा या विषयावर एक दिवसीय मार्गदर्शन कार्यशाळा गुरूवार, 13 फेब्रुवारी रोजी घेण्यात आली.

याप्रसंगी अदानी पॉवर महाराष्ट्र लिमिटेड तिरोडा येथील सुरक्षा व्यवस्थापक सुहास वाकोडकर यांनी विविध उदाहरणांतून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच मुलभूत व वर्तन सुरक्षा याचे महत्व समजावून सांगितले. यावेळी प्राचार्य सी. डी. गोडघाटे यांनीसुद्धा मार्गदर्शन केले. संचालन अधिव्याख्याता प्रा. गभणे यांनी केले. आभार प्रा. लेखानंद राऊत यांनी मानले. यावेळी विभाग प्रमुख वाकोडकर, प्रा. देशमुख, प्रा. मेश्राम व इतर प्राध्यापक उपस्थित होते.



# २८ रक्तदात्यांनी केले रक्तदान



शासकीय तंत्रनिकेतनमध्ये रक्तदान शिबिराप्रसंगी उपस्थित मान्यवर.

**गोंदिया :** शासकीय तंत्रनिकेतन गोंदिया येथे कॅम्पस हेल्थ व इकोसिस्टम समितीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयाच्या रक्तपेढी विभागाचे रक्तसंकलन अधिकारी डॉ. पलाश गणवीर, पीआरओ अनिल गोंडाणे, सायंटीफीक ऑफीसर हनवते व इतर कर्मचारी उपस्थित होते. विभागप्रमुख डॉ. आर. आर. वाकोडकर उपस्थित होते. कार्यक्रमात अनिल गोंडाणे यांनी रक्तदान विषयक माहिती दिली. तसेच रक्तदानाचे फायदे सर्वांना समजावून सांगितले.रक्तदान शिबिरात संस्थेतील २६ विद्यार्थी, अधिकारी व कर्मचारी व संस्थेबाहेरील दोन व्यक्ती अशा एकूण २८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यशस्वीतेसाठी एस.एन.कोटकर, पी.आर.पवार, व्ही.डी.कापगते, ए.बी.सिन्हा यांनी सहकार्य केले.

# व्यक्तिगत स्वच्छता विषय पर व्याख्यान



गोंदिया (का). सहयोग हास्पिटल की ओर से गवर्नमेंट पालिटेक्निक कालेज में डाक्टरों द्वारा पॉलीस्टिक अंडाशय सिंड्रोम (पी.सी.ओ) व किशोर लड़कियों की व्यक्तिगत स्वच्छता के विषय पर व्याख्यान दिया गया. सहयोग हास्पिटल की ओर से स्त्री रोग विशेष डा. सुमित पिसे ने सेवा प्रदान की. इसका लाभ 85 छात्राओं और शिक्षकों ने लिया. सफलतार्थ गवर्नमेंट पालिटेक्निक कालेज के शिक्षकगणों ने प्रयास किया. डा. पिसे ने व्याख्यान में विद्यार्थियों व शिक्षकों को उनकी रोग प्रतिरोधक क्षमता को बढ़ाने के लिए, पॉलीसस्टिक अंडाशय सिंड्रोम (पी.सी.ओ) व लड़कियों की व्यक्तिगत स्वच्छता के बारे में मार्ग दर्शन किया.

# आरोग्य तपासणी शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

गोंदिया : स्थानिक शासकीय तंत्रनिकेतन येथे प्राचार्य सी.डी. गोळघाटे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी प्राथमिक आरोग्य केंद्र खमारी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.नितीन काटोले, डॉ. सोनवाने, डॉ.गौतम, डॉ.टेंभुर्णीकर आणि त्यांचे सहायक कर्मचारी उपस्थित होते.या शिबिरांतर्गत विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांच्या बी.पी.,मधूमेह, सीबीसी, हिमोग्लोबीन तपासणी,रक्तगट तपासणी करण्यात आली.२०० विद्यार्थी व कर्मचारी यांनी या शिबिराचा लाभ घेतला. याप्रसंगी प्राचार्य सी.डी.गोळघाटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आरोग्य चांगले राखण्यासाठी आपली नियमित दीनचर्या, व्यायाम, आहार यांचे विशेष महत्त्व असल्याचे सांगितले. या वेळी स्थापत्य विभागाचे विभाग प्रमुख साहू, विज्ञान विभागाचे समन्वयक निकोडे आणि अधिकारी उपस्थित होते. शिबिरासाठी एस.काटेकर, पी.आर.पवार, व्ही.टी.कापगते व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.



तंत्रनिकेतन विद्यालयात आयोजित शिबिरात विद्यार्थ्यांची तपासणी करता डॉक्टर